ISSN 2229-4406

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education for all Subjects

# UNIVERSAL
## RESEARCH ANALYSIS

**EDITOR IN CHIEF**
**Dr. BALAJI KAMBLE**

# INDEX


| Sr. No | Title for Research Paper | Page No |
|---|---|---|
| 1 | Facile Method of 1,2-bis(Substituted phenyl)-1H-benzimidazole synthesis using silicagel as an efficient catalyst<br>**V. B. Rathod, P. R. Totawar** | 1 |
| 2 | Feminine Consciousness and Transformation of Characters in Manju Kapur's Difficult Daughters<br>**Dr. B. S. Bhosale** | 7 |
| 3 | The Role of News Papers in Student's Life - Special Reference to Nanded City<br>**Dr. Somnath Kishanrao Pachling** | 12 |
| 4 | Performance in Sports<br>**Dr. B. N. Gapat** | 17 |
| 5 | राष्ट्रीयकृत बँकाच्या विलिनीकरणाचा चिकित्सक अभ्यास<br>**बी. आर. कुंडगीर** | 21 |
| 6 | भारतातील आर्थिक सुधारणा - एक अभ्यास<br>**डॉ. एस. आर. पाटील** | 29 |
| 7 | भारतीय परराष्ट्र धोरणातील आर्थिक विकासाचा पैलू<br>**डॉ. बालाजी वसंतराव चिलर्गे** | 36 |
| 8 | स्त्रीवादी इतिहास लेखन प्रवाह<br>**डॉ. डी. ए. पाईकराव** | 43 |
| 9 | रा. रं. बोराडे यांच्या कथेतील स्त्री व्यक्तिरेखा : एक आकलन<br>**डॉ. सुनीता सांगोले** | 47 |
| 10 | जागतिकीकरण : ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि वाटचाल<br>**डॉ. एस. व्ही. शेटे** | 51 |
| 11 | महात्मा फुले यांचे सामाजिक विचार<br>**डॉ. मीना भगवानराव बोर्डे** | 57 |

9

# रा. रं. बोराडे यांच्या कथेतील स्त्री व्यक्तिरेखा : एक आकलन

*डॉ. सुनीता सांगोले*
मराठी विभाग,
दयानंद कला महाविद्यालय,
लातूर, जि. लातूर

**Research Paper - Marathi**

इ.स. १९६० च्या नंतर आधुनिक मराठी वाङ्मयाच्या क्षितीजावर ग्रामीण, आदिवासी, दलित असे विविध वाङ्मयप्रकार उदयाला आले. विशेषतः ग्रामीण साहित्यामध्ये कादंबरी व कथा हे दोन वाङ्मय प्रकार भरभराटीस आले. कथेच्या संदर्भात विचार करायचा तर हरिभाऊ आपटेंच्या कथेत ग्रामीण संदर्भ काही प्रमाणात दिसतात; पण श्री.म.माटे यांच्या कथेने खरे ग्रामीण चित्रण मांडलेले दिसून येते. व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, द. मा. मिरासदार इ. सिद्धहस्त लेखकांनी ग्रामीण कथेला स्वतःचा नवा चेहरा मिळवून दिला. यानंतर ग्रामीण कथा बाळसे धरू लागले.

प्रारंभीच्या पिढीच्या मध्यावर म्हणजे इ.स. १९६० ते १९९० या तीन दशकांच्या कालावधीमध्ये आनंद यादव, रा. रं. बोराडे, दत्ता भोसले, नागनाथ कोतापल्ले, भास्कर चंदनशीव इ. लेखकांनी मराठी कथेचे विश्व प्रगल्भ व समृद्ध केले. त्या कालखंडातील सिद्धहस्त कथा लेखक म्हणून रा. रं. बोराडे यांचा गौरवपूर्ण उल्लेख करावा लागतो. बोराडे यांनी कथा लेखनाला इ.स. १९५७ ते १९६३ या काळात म्हणजे त्यांच्या महाविद्यालयीन शिक्षणाच्या काळात प्रारंभ केला होता. प्रारंभीची त्यांची कथा ग्रामीण, नागरी वळणावरची असून व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, द. मा. मिरासदार या कथा लेखकांच्या प्रभावातून ही आलेली दिसून येते. परंतु 'पेरणी' या कथा संग्रहाने त्यांचे वेगळेपण सिद्ध झाले. वेगवेगळ्या वळणाच्या वाटचालीवरून त्यांची कथा उत्तरोत्तर श्रीमंत, सकस, कसदार होत गेली. त्यांची कथा ग्रामीण सामाजिक घटक, वास्तवाबरोबर कौटुंबिक जिव्हाळा, मानवी मूल्यांचा आत्मशोध घेण्याचा प्रयत्न करते. या कथेतून सर्व ग्राम जीवनाला स्पर्श झालेला दिसून येतो. बोराडे यांच्या कथेतून येणारे ग्रामजीवन यातील उल्लेखनीय घटक म्हणजे कौटुंबिक नाते संबंध, ग्राम जीवनातील सामाजिक संस्था, विवाह संस्था, सोयरे-संबंध, परंपरा, रूढी, चालीरिती यांचे यथोचित दर्शन या कथांतून घडताना दिसते. बोराडे यांच्या कथेतून ग्रामीण जीवनातील कुटूंब व्यवस्थेतील नाते संबंध, त्यातील ताण-तणाव, सेवाभाव, त्यागी वृत्ती, स्वार्थी भाव, दांभिकपणा यांचे यथार्थ चित्रण

पैलूंना स्पर्श करणारे आहे. दारिद्र्याचा शाप घेऊन आयुष्यभर दुःखाचे ओझे डोक्यावर घेऊन मृत्यूचे स्वागत करणाऱ्या स्त्रियांची ही कहाणी आहे. या स्त्रियांना आपले कर्तृत्व, श्रम किंवा त्याग याच्या श्रेयसाचे भान नाही. उलट मेणबत्तीप्रमाणे जळून इतरांच्या जीवनात प्रकाश तेवता ठेवणाऱ्या अशा या व्यक्तिरेखा आहेत. बोराडे यांच्या या कथा काहीश्या व्यंकटेश माडगूळकर यांच्या कथेतील व्यक्तीरेखांशी नाते सांगणाऱ्या वाटतात. तरीही त्यांचे वेगळेपण म्हणजे मराठवाड्यातील ग्राम जीवनातील स्त्री जीवनाचा सर्वांगीण कस लावणाऱ्या या व्यक्तीरेखा उतरल्या आहेत.

**निष्कर्ष :**

०१. ग्रामीण स्त्रियांचे भावविश्व टिपण्यात कथा यशस्वी झाली आहे.

०२. बोराडे यांच्या कथेतील स्त्री व्यक्तिरेखा आपल्या व्यक्तिगत जीवनात आलेले दुःख, अवहेलना पचवून आधुनिक विचारांचा व सुधारणावादाचा पुरस्कार करताना दिसून येतात.

०३. बोराडे यांनी आपल्या कथेतून ग्रामीण जीवनातील स्त्री-पुरुष संबंधांच्या सर्व पैलूंना स्पर्श केला आहे.

०४. नितांत जीवननिष्ठा, आत्मसमर्पण, तरीही कुठलाच अभिनिवेश न बाळगणाऱ्या अशा या स्त्री व्यक्तिरेखा आहेत.

०५. सहजतेने ग्रामीण बोलीतून अभिव्यक्त होत जाणाऱ्या स्त्री व्यक्तिरेखा हा बोराडे यांच्या कथेचा महत्त्वाचा विशेष होय.

## संदर्भ सूची :-

०१. रा. रं. बोराडे यांचे साहित्य : स्वरूप आणि अस्वाद - डॉ. भीमराव वाघचौरे

०२. रा. रं. बोराडे यांची कथा - डॉ. वासुदेव मुलाटे

**ISSN 2229-4406**

ISSN 2229-4406

Published, Printed, Owned by Sow. Mahanada Balaji Kamble & Edited by Balaji Kamble & Printed at Jyotichandra Offset Printing & Binding & Published by Jyotichandra Publication, Gyandev-Parvati, R-9/139/6, Near Vishal School, L.I.C. Colony, Pragati Nagar, Latur, Dist. Latur - 413 531 (M.S.) India.

Editor In Chief Dr. Balaji Kamble, Mob. No. 9423346913